**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४,२२६९४९८५, Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com

**विषय:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र./ल. ले/२३७/सन २०१८-१९
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: १८/०३/२०१९.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
४. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
५. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/ नवी मुंबई यांचे प्रतिनिधी.
६. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली /मिरा-भाईंदर /वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल /भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर यांचे प्रतिनिधी. (उप आयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
९. पोलीस अधिक्षक,ठाणे(ग्रामीण) रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग यांचे प्रतिनिधी (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी)
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
११. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे प्रतिनिधी.
१२. शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) चे प्रतिनिधी.
१३. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) चे प्रतिनिधी.
१४. झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी.
१५. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१६. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी
१७. नवी मुंबई एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१८. बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१९. वनशक्ती (NGO) यांचे प्रतिनिधी
२०. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२१. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

संदर्भ :- शासन निर्णय क्र. एस-३०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३,दि. १६ ऑक्टोबर, २०१८.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **चौथी** बैठक **सोमवार,** दिनांक **२५/०२/२०१९** रोजी **दुपारी ३.००** वाजता मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ४ थी बैठक**
**दिनांक २५/०२/२०१९ रोजीचे इतिवृत्त**
**मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**

अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली सदरची बैठकीत घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. एन वासुदेवन | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| २ | डॉ. प्रशांत नारनवरे | जिल्हाधिकारी पालघर | जिल्हाधिकारी पालघर |
| ३ | श्री. सिध्दराम सालीमठ, | उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग. | विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई. |
| ४ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ५ | श्री. विकास जगताप | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ६ | डॉ. किशोर गवस | उप आयुक्त, वसई विरार मनपा | वसई - विरार महानगरपालिका. |
| ७ | डॉ. एस. चाबुकस्वार | उप आयुक्त | नवी मुंबई महापनगपालिका. |
| ८ | श्री. अजितकुमार अंबी | सहाय्यक आयुक्त | मुंबई महानगरपालिका |
| ९ | श्री. विश्वास दि. गुजर | अपर चिटणीस | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर. |
| १० | श्री. दिपक पुजारी | उप-आयुक्त,मीरा,भाईंदर महानगरपालिका | आयुक्त मीरा, भाईंदर महानगरपालिका |
| ११ | श्री. अशोक वाघाये | नोडल अधिकारी | एम.एम.आर.डी.ए |
| १२ | श्री. अधिक पाटील | तहसिलदार ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रतिनिधी |
| १३ | श्री. अमित सानप | तहसिलदार पनवेल | जिल्हाधिकारी रायगड यांचे प्रतिनीधी |
| १४ | श्री. किरण सुरवसे | तहसिलदार वसई. | तहसिलदार वसई जि. पालघर |
| १५ | श्रीमती कल्पना गोडे | तहसिलदार, उरण | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १६ | श्री. स्टॅलिन डी. | संचालक | वनशक्ती |
| १७ | श्री. विनोद के. पुंशी | संचालक | नवी मुंबई एन्वायरमेंट प्रीझरवेशन सोसायटी |
| १८ | श्री. डेबी गोएंका | बी.ई.ए.जी. | बॉम्बे एव्हारमेंट ॲक्शन ग्रुप |
| १९ | श्रीमती. मनिषा प्रधान | प्रदुषण नियंत्रण अधिकारी | ठाणे महानगरपालिका |
| २० | श्री. अविनाश शिंदे | उपविभागीय अधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| २१ | श्री. प्रमोद पाटील | नोडल अधिकारी | सिडको, नवी मुंबई. |

प्रथमत: मुंबई - मुंबई उपनगरे कांदळवन सनियंत्रण समितीच्या तक्रारींवर केलेली कार्यवाहीबाबत चर्चा झाली. सदर समितीच्या आतापर्यंत चार बैठका घेण्यात आल्या असून बैठकीमध्ये MCZMA व MPCB यांच्या कार्यालयातून कोणीही प्रतिनिधी आतापर्यंत उपस्थित राहत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने समितीने पुढील बैठकीमध्ये MCZMA व MPCB यांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्याबाबत पत्राद्वारे कळविण्याच्या सूचना समितीने दिल्या व तद्नंतर या समितीकडे प्राप्त तक्रारींवर केलेली कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

| तक्रार क्र. | तक्रार | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| **मुंबई, मुंबई उपनगर कांदळवन समितीच्या तक्रारींबाबत..** | | | |
| १ | कांदळवन क्षेत्रातील डेब्रिस काढून टाकणे. | • या तक्रारीबाबत मुंबई महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींनी डेब्रिज काढून टाकण्यासाठी टेंडरिग प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे असे सागितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने लवकरात लवकर कांदवन क्षेत्रातील डेब्रिज काढून टाकून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना उपस्थित सहाय्यक आयुक्त, मुंबई महापालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या. | मुंबई महापालिका<br>महसुल<br>वन<br>म्हाडा |
| २ | कांदळवन रोपांची लागवड व देखभाल करणे. | • कांदळवन रोपांची लागवड करण्याबाबत विभागीय वन अधिकारी यांनी त्यांच्या दि. २५.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार १३.९७८३ हे. क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित केलेले असून त्या क्षेत्रावर नोव्हेंबर २०१९ मध्ये कांदळवन व सहयोगी प्रजातींची लागवड करण्यात येणार आहे असे सांगितले.<br>• तसचे वडाळा, कुलाबा व छेडानगर येथील ६ हे. क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्याचे प्रस्तावित असून त्या ठिकाणी ही कांदळवन प्रजातींची लागवड करण्यात करिता २५ लाख इतकी अंदाजपत्रक कांदळवन प्रतिष्ठाना अंतर्गत सादर करण्यात आला आहे असेही सांगितले.<br>• त्या अनुषंगाने सदर चा विषय बंद करण्याबाबतच्या सूचना दिल्या. | वन |
| ३ | श्री. रेजी अब्राहम, अध्यक्ष, युनायटेड असोसिएशन यांनी दाखल केलेल्या तक्रारींचीचौकशी सत्वर करून आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करणे.<br>१. लक्ष्मीनगर, मधील कांदळवन ऱ्हासाबाबत.<br>२. डिंगेश्वर मंदिराभोवतालचे क्षेत्र.<br>३. जलाराम मंदिराभोवतालचे क्षेत्र. | • सदर ठिकाणी कांदळवनाबाहेर बफर झोनमधील अनधिकृत बांधकाम असून या ठिकाणी दि. ८ मार्च, २०१९ रोजी अनधिकृत बांधकाम हटविण्याची कार्यवाही सदर तीन्ही ठिकाणी करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर देण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे |
| ४ | विविध अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय कारवाई.<br>श्री. किशोर गांधी | • विविध अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय कारवाईबाबत समितीने संबंधीत यंत्रणेला कळविण्यात यावे व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास समितीने सांगितले.<br>• त्या अनुषंगाने सदर चा विषय बंद करण्याबाबतच्या सूचना | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे<br>मुंबई महापालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | तक्रारीसाठीचे संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत.<br>१.मार्वे (INS हमला)<br>२.मालाड (प), लगुन रोड व चारकोप तक्रार क्र. २८/२०१७, ४४ ते ४८ / २०१७ | • मालाड (प), लगुन रोड याबाबत अद्याप अहवाल प्राप्त नसल्याबाबत अपर चिटणीस, मुंबई उपनगर यांनी सांगितले.<br>• महापालिकेमार्फत उपस्थित सहाय्यक आयुक्त यांना या तक्रारीबाबत अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे समितीने त्यांना पुढील बैठकीमध्ये माहिती सादर करणेच्या सूचना दिल्या.<br>• RCC बंगला ॲन्ड कंपनी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्य प्रतिनिधींनी सांगितले.<br>• तसेच या तक्रारीबाबत मालवणी पोलीस स्टेशन यांना विचारणा केली आहे त्यांना ही योग्य माहिती देता आली नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत गांभीर्यपूर्वक विचार करुन या जागेवरील डेब्रिज काढून कांदळवनाच्या रोपांची लागवड करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच मालाड लघुन रोड या तक्रारी बाबत अद्याप बैठक घेण्यात अलेली नाही असे मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने दि.२७ फेब्रुवारी २०१९ रोजी या बाबत बैठक ठेवून १५ दिवसात या तक्रारीबाबतचा अहवाल सदस्य सचिवांना सादर करण्याचे निर्देश दिले. | महसूल, महापालिका, पोलिस<br><br>जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ७ | कुंभारकला येथे गटार बांधणीबाबत. | • दि.१३.११.२०१८ रोजी बैठक घेण्यात आली सदर बैठकीत महापालिका, म्हाडा व महसूल यांच्या मार्फत एकत्र स्थळ पाहणी करण्यात आली आहे परंतु अद्याप अहवाल प्रलंबित असल्याचे अपर चिटणीस, मुंबई उपनगर यांनी दि. १६.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत सांगितले होते.<br>• त्या अनुषंगाने समितीने या बाबत ७ दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• परंतु अद्याप अहवाल प्राप्त झालेला नसल्याने समितीने मा.उच्च न्यायालयात या समितीचा अनुपालन अहवाल सादर करावयाचा असल्याने गांभीर्यपूर्वक विचार करुन या तक्रारीबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश मुंबई महानगरपालिकेला आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना दिल्या. | मुंबई महापालिका जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ८ | सदस्य श्री. रेजी अब्राहम यांचे दि. १९/०४/२०१८ रोजीचे निवेदन. | • या तक्रारीबाबत अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही असे निदर्शनास आले<br>• त्या अनुषंगाने समितीने दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी या बाबत बैठक ठेवून श्री.रेजी अब्राहम यांच्या सर्व तक्रारींबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत योग्य ती कार्यवाही करुन या | मुंबई महापालिका जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | |
| ९ | श्रीं. रेजी अब्राहम यांचे दि. 26/05/2018 च्या इमेल वरुन मिळालेले दि. 28/05/2018 चे निवेदन. | • सदर विषया बाबत दि.०४/०९/२०१८ रोजीच्या बैठकीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालवणी यांनी स्थळ पाहणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे.<br>• BMC चे नोडल अधिकारी यांनी नोटीस दिलेल्या २२ प्रकरणी ५० मी ची खात्री करून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करणे.<br>• टिपू सुलतान ग्राऊंड, लागुन रोड, मालवणी मालाड (प.) येथील उपजिल्हाधिकारी (अ.नि.) यांच्यामार्फ़त केलेले निष्कासनाचा अहवाल सादर करणे.<br>• वरील सर्व अहवाल प्रलंबित असून कोणत्याही यंत्रणेला केलेल्या कार्यवाहीचे तपशिल सादर करता आले नाही. या विषयांचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना समितीने दिल्या व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना याबाबत निष्कासनाचा अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना दिल्या. | पोलिस<br>मुंबई महापालिका<br><br>जिल्हाधिकारी<br>मुंबई उपनगर |
| १० | श्री. रेजी अब्राहम यांची दि. 31/07/2018 ची तक्रार | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून व समन्वय साधून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीमध्ये दिल्या होत्या.<br>• या बाबत दि.१३.११.२०१८ रोजी सयुक्त बैठक घेतली असलेचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी या विषयी केलेली कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर कराणेच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी<br>मुंबई उपनगरे |
| ११ | श्री. रेजी अब्राहम यांची दि. 04/09/2018 ची तक्रार | जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून समन्वय साधून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करणेचे निर्देश दिले होते.<br>• या बाबत दि.१३.११.२०१८ रोजी सयुक्त बैठक घेतली असलेचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी या बाबत बैठक ठेवून श्री.रेजी अब्राहम यांच्या सर्व तक्रारींबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत योग्य ती कार्यवाही करुन या तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | मुंबई महानगरपालिका<br>जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे आणि MHADA |
| १२ | श्री. रेजी अब्राहम यांची दि. २६/०९/२०१८ ची व्हॉटस् ॲप वरील व दि. ०२/१०/२०१८ | • श्री. रेजी अब्राहम यांनी दि.२६.०९.२०१८ रोजी व्हॉटस् ॲप वर तसेच दि.०२.१०.२०१८ चे निवेदनाद्वारे चारकोप आर.जी प्लॉट २ बाबत तक्रार केली होती. त्याबाबत | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व म्हाडा |

| | | | |
|---|---|---|---|
| | ची तक्रार | जिल्हाधिकारी यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून व समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा. तोपर्यंत म्हाडाने सर्व बांधकाम थांबवावे व याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले होते.<br>• सदस्य सचिव यांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी दि.१३.११.२०१६ रोजी संबंधितांची बैठक घेतली तसेच संयुक्त स्थळ पाहणी झाली असून जिल्हाधिकारी यांनी सादर कलेले अहवालानुसार RG .2 प्लॉट अंशत: बाधीत होत आहे तथापी पॅगोडाचे बांधकाम कांदळवना पासून ५० मी. अंतराबाहेर असलेबाबत जिल्हाधिकारी मुबई उपनगर यांचा अहवाल प्राप्त झाला असलेचे सांगितले.<br>• तसेच याबाबत दि.११.१०.२०१८ चे बैठकीत काम थांबविण्याचे निर्देश दिले होते असे सांगितले.<br>• सदर काम कांदळवन क्षेत्रात अथवा त्याच बफर क्षेत्रात नसलेने या कामास दिलेली स्थगिती उठविणेत यावी व या कामात बफर झोन मध्ये कोणत्याही कायद्याचा अथवा उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे म्हाडाचे प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेला कळविणेत यावे असे समितीने निर्देश दिले व ही तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | |
| **कांदळवन समितीच्या तक्रारींवर झालेली चर्चा** | | | |
| **तक्रार क्र.** | **तक्रार** | **करावयाची कार्यवाही** | **अंमलबजावणी करणारी यंत्रणा** |
| १ | श्री. राजेंद्र पाटील दि.१९.११.२०१८ Destructioin of mangroves due to slum encroachment and debris is dumping at mangroves behind Neminath Heights Bldg, Gaurav city, near Mayor Bungalow, Mira road east. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी दि.३१.०५.२०१८ रोजी स्थळ पाहणी केली असून सदर जागेवर ५० मी. अंतरावर भरणी केल्याचे दिसून येते असे सांगितले.<br>• समितीने तहसिलदार ठाणे यांना सदर जागेवर CRZ 1 उल्लंघन झाल्यामुळे नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या व सदर क्षेत्रात कांदळवन आहे किंवा कसे याबाबत उपवनसंरक्षक ठाणे यांच्याकडून माहिती घेण्यास सांगितले.<br>• सदर जागेवरील डेब्रिज हटविण्यासाठी समितीने उप आयुक्त मिराभाईंदर यांना कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच मिरा-भाईंदर व ठाणे महानगरपालिकेच्या ज्या क्षेत्रात कांदळवन आहे त्यांचे Notification अजूनही वन क्षेत्र म्हणून झालेले नाही. मा. उच्च न्यायालयाने ज्या ठिकाणी कांदळवन आहे ते क्षेत्र वनक्षेत्र म्हणून घोषित करण्याचे २००५ आदेशाचे उल्लंघन होत आहे असेही समितीने | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सांगितले. त्या अनुषंगाने समितीने प्राधान्याने शासकीय जागेवरील भारतीय वन संरक्षण अधिनियम १९२७ अंतर्गत सर्व कांदळवन क्षेत्र अधिसूचीत करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जबाबदारी घेण्याचे सूचीत केले.<br>• तसेच कांदळवनावर वारंवार भराव होऊ नये त्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी CCTV कॅमेरे लावण्याबाबत ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी कांदळवन आहे त्या ठिकाणी CCTV कॅमेरे बसविण्यात आले आहेत व उर्वरित क्षेत्रात ज्या ठिकाणी कांदळवन आहे त्या क्षेत्राचे नकाशे कांदळवन कक्षामार्फत घेऊन CCTV कॅमेरे बसविण्यात येतील असे सांगितले. त्यानुसार समितीने या बाबत कांदळवन कक्षासोबत योग्य नियोजन करुन पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या.<br>• तसेच डेब्रिज नेणाऱ्या प्रत्येक वाहनास GPS कायम स्वरुपी लावण्याचे निर्देश दिले तसेच CRZ 1 चे उल्लंघन झाल्यामुळे समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | |
| ३ | श्री. झोरु भाथेना :- जूहू तारा कोळी जमात दि.२०.११.२०१८<br>Complaint reg the destruction<br>of Juhu Koliwada Beach (CRZ-1/NDZ/Mangrove Forest) &<br>Cutting of Mangorve | • सदरचा विषय मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.<br>• तसेच या बाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी या बाबत मा. उच्च न्यायालयात अहवाल सादर केला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |
| ६ | श्रीमती श्वेता भट – दि.२३.११.२०१८<br>Destruction of Mangroves at Pahadi Goregaon, Survey no. 161, CTS 1 | • सदस्य सचिवांनी हे क्षेत्र वन विभागाचे अखत्यारितील नसलेचे सांगितले.<br>• समितीने सदर जागेतील भराव टाकणाऱ्यांवर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना व पोलीसांना पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई करणेचे निर्देश दिले.<br>• तसेच या तक्रारीबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, पश्चिम मुंबई सदर जागेची दि.२१.१२. २०१८ रोजी स्थळ पाहणी केली असता सदर ठिकाण हे पहाडी गोरेगाव मधील सर्व्हे नं. १६१ मधील आहे. सदर गॅरेज हे २००३ साली अस्तीत्वात दिसून येत आहे. सदर क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवनाचा भाग नाही असा अहवाल दिला आहे.<br>• या तक्रारीबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी या जागेवर १९९८ साली उल्लंघन झाले होते.<br>• या तक्रारीबाबत MCZMA यांना पुढील कार्यवाही करण्यासाठी पत्र पाठविण्याचे समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर,<br>२. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी या तक्रारीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल, FIR सदस्य सचिवांना देण्याबाबत सांगितले व ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | |
| ७ | श्री. मंगेश गांधी दि.२३.११.२०१८ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-1<br>Debris dumping in Gorai creek Mangroves | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेची स्थळ पहाणी झाली गुन्हा दाखल करण्यासाठी बोरीवली पोलीस स्टेशन येथे दि.७.०२.२०१९ रोजी केला आहे असे सागितले.<br>• तसेच समितीने या जागेवरील डेब्रिज काढण्यासाठी BMC यांना निर्देश दिले व या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>२. BMC |
| ८ | श्री. बी.एस. यादव- दि.२६.११.२०१८<br>वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-2<br>Mangrove Destruction | • समितीने सदर क्षेत्राची तपासणीकरून पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी करावी असे निर्देश दिले होते.<br>• या तक्रारीबाबत अहवाल सदस्य सचिवांना देण्याबाबत समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ९ | श्री. जयेश गुप्ता – दि.२४.११.२०१८<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe-Desai-Khardi Gaon, Thane. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी आज रोजी कांदळवनाचे नुकसान झालेले नसून पूर्वी या जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी लागेल असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार यांना सदर जागेचे Geo-Co-ordinates सदस्य सचिवांना देण्यास सांगितले व या क्षेत्रात २००५ सालापूर्वी कांदळवन होत अगर कसे? याची तपासणी करून पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी ठाणे आणि<br>२. आयुक्त ठाणे महानगरपालिका |
| १२ | श्री. लुक मेंन्डीस दि.३०.११.२०१८<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • या तक्रारीबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या दि.१९.०१.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राच्या हद्दीबाहेर १५ ते २० मी. अंतरावर बफर झोन मध्ये आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना कार्यवाही करण्यास सांगितले व महानगरपालिकेला २ महिन्यात सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. |
| १३ | श्री. अमित शुक्ला - दि.०१.१२.२०१८<br>Debris on Water Body | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांच्या दि.२२.०२. २०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार विषयांकीत जागेची पंचांसमक्ष पाहणी केली असता मौजे वाशी, जि. ठाणे येथील सेक्टर १० वाशी मधील हिरानंदानी फोर्टीस हॉस्पीटलच्या परिसरामध्ये कोठेही कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले नाही. | जिल्हाधिकारी ठाणे, जि. ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • सदरची तक्रारी ही पाणथळाशी संबंधीत असल्याने ही तक्रार पाणथळ तक्रार निवारण समितीकडे पाठविण्याबाबत समितीने सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना सदर जागेचे Geo-Co-ordinates सदस्य सचिवांना देण्यास सांगितले व या क्षेत्रात २००५ सालापूर्वी कांदळवन व पाणथळ होते अगर कसे? याची तपासणी करून पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेचे निर्देश दिले. | |
| १४ | श्री. एश्ले लोबो दि.०२.१२.२०१८<br>Mangroves being cut and house being build at Bandra | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर क्षेत्रात कांदळवन नसल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या व त्यानंतर ही तक्रार बंद करण्याबाबतचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मंबई उपनगर, मुंबई.<br>२. जिल्हाधिकारी, मुंबई शहर. |
| १५ | श्री. रेजी अब्राहम –<br>दि.०३.१२.२०१८<br>Johny garage/ ICCU franchisee another illegal construction in the ever growing list of such illegal structures in Charkop Village | • समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दि.२२.०२.२०१९ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर जागेच्या पुर्वेस ॲप्रोच रोड, पश्चिमेस झोपडया, उत्तरेस औद्योगिक गाळे, पक्के मंदिर व दक्षिणेस पक्क्या चाळी आहेत.<br>• सदर गॅरेजच्या जागेपासून कांदळवन अंदाजे १०० ते ११० मी. अंतरावर असून त्याठिकाणी कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही असा अहवाल सादर केला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने अहवालानुसार ही तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मंबई उपनगर |
| १६ | श्री. धिरज परब –<br>दि.०३.१२.२०१८<br>मीरा भाईंदर महापालिकेने भाईंदर पश्चिम येथे सुभाषचंद्र बोस नावे कांदळवन, पाणथळ व सीआरझेड बाधित क्षेत्राचा ऱ्हास चालवल्या बाबत | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी सदर जागेची स्थळ पाहणी झाली असून आज रोजी तेथे कांदळवन नसल्याचे सांगितले.<br>• तसेच या पूर्वी या जागेवर भराव झाल्याने FIR दाखल केलेला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना सदर जागेचे Geo-Co-ordinates सदस्य सचिवांना देण्यास सांगितले व या क्षेत्रात २००५ सालापूर्वी कांदळवन होते अगर कसे? याची तपासणी करून पुढील कार्यवाही करून अहवाल सादर करणेचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, ठाणे<br>अहवाल अप्राप्त |
| १७ | श्री.धिरज परब दि.०५.१२.२०१८<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • दि.८.०२.२०१९ समितीने उपसमितीमार्फत स्थळ पाहणी केली.<br>• या स्थळ पाहणीचा अहवाल उपसमितीमार्फत तपासून समितीपुढे सादर केला जाईल असे तहसिलदार ठाणे यांनी सांगितले तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सदर जागेवरी बांधकाम थांबविण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | उत्कर्ष सार्वजनिक मित्र मंडळ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-3 दि.०३.१२.२०१८<br>Mangroves Cutting in Gorai Sector 2 | • समितीने मुंबई महानगरपालिकेने या क्षेत्रात डेब्रीज काढून कांदळवन लागवड करून क्षेत्राचे Restoration करावे असे निर्देश दिले होते.<br>• डेब्रिज काढण्याबाबत मुंबई महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींनी या बाबत निविदा प्रक्रीया सुरु आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तात्काळ सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही करण्यास व या जागेचे लवकरात लवकर Restoration करण्यास सांगितले व त्या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. मुंबई महानगरपालिका |
| २० | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०९.१२.२०१८<br>Mangrove destruction across Uran-1 | • समितीने या बाबत कांदळवनाचे नुकसान झाल्याने संबंधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिले होते.<br>• परंतु या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने समितीने या तक्रारीबाबत संबंधीतांवर FIR दाखल करुन तात्काळ केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास व सिडको यांच्या प्रतिनिधींना सदर जागेवरील पाण्याचा प्रवाह योग्य रितीने चालू ठेवण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगङ<br>२.सिडको,नवी मुंबई.<br>अहवाल अप्राप्त |
| २१ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०९.१२.२०१८<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांच्या दि. २२.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार या तक्रारीबाबत दि. २१.०२. २०१९ रोजी स्थळ पाहणी आयोजीत करण्यात आली होती, मात्र स्थळ पाहणीकरीता अर्जदार यांना कळविण्यात आले असून देखील ते स्थळ पाहणीस उपस्थित राहीले नाही.<br>• सदर जागेवर सायन पनवेल हायवे लगत कोठेही कांदळवनाचे नुकसान झालेले नाही. सदरचे कांदळवन हे सायन पनवेल रोडपासून अंदाजे १० ते १५ मी. अंतरावर असल्याचे दिसून येते. सायन पनवेल रोडच्या रुंदीकरणाच्या कामामुळे आजरोजी कांदळवनाचे कोठेही नुकसान झालेले नाही.<br>• परंतु या तक्रारीबाबत तक्रारदार उपस्थित नसल्याने समितीने वाशी टोल ब्रिज येथे तक्रारदारासोबत पुन्हा एकदा स्थळ पाहणी करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| २२ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०९.१२.२०१८<br>Mangrove destruction across Uran-2 | • या तक्रारीबाबत तक्रारदारासोबत स्थळ पाहणी झाली असून तेथे पर्यावरणीय मान्यतेच्या अटींचा उल्लंघन झाल्यामुळे समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना FIR दाखल करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु अद्याप FIR न झाल्याने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना प्राधान्याने या तक्रारीबाबत FIR दाखल करण्याच्या सूचना दिल्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड<br>अहवाल अप्राप्त |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>Mangrove destruction across Uran-3 | • या तक्रारीबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या दि.२५.०१.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे अधिसुचित राखीव वन कांदळवनाच्या हद्दी बाहेर येत असून तक्रारीत नमूद जागा बफर झोन हि महसूल विभागाच्या ताब्यात येते. | |
| २४ | श्री. दिपक कामथ - दि.०९.१२.२०१८<br>Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area | • या तक्रारीबाबत विभागीय वन अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरचे क्षेत्र अधिसुचित राखीव वन कांदळवनाच्या हद्दी बाहेर येत असून तक्रारीत नमुद जागा बफर झोन हि महसुल विभागाच्या ताब्यात येते.<br>• समितीने या तक्रारीबाबत मुंबई महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सदर जागेवरील अनधिकृत काम बंद करण्याच्या व डेब्रिज काढण्याच्या सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई महानगरपालिका आणि वन विभाग |
| २५ | अज्ञात व्यक्ती - दि.०९.१२.२०१८ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-6<br>Destruction of Mangroves. | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्यामार्फत स्थळ पाहणी झाली असून तेथे कांदळवनाची तोड झालेली नाही असे सांगितले, परंतु या ठिकाणी यापूर्वी कांदळवन होते किंवा कसे याबाबत वन विभागाकडे दि.१५.०१.२०१९ रोजी अभिप्राय मागविण्यात आला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदस्य सचिवांना सदर जागा कांदळवन आहे किंवा कसे याबाबत MRSAC वेबसाईटवर ही जागा तपासण्याच्या सूचना दिल्या व त्या नुसार पुढील कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २६ | श्री. विनोद पुन्शी दि.११.१२.२०१८<br>Dumping of Debris on DPS Road within 50 meters of mangroves. Sector - 52, Nerul, Navi Mumbai, | • सिडको यांच्या दि.०१.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवर रस्त्यावर माती टाकल्याचे आढळले. मातीचा ढीग काढण्यासाठी निविदा प्रक्रीया चालू केली असून प्रक्रीया पूर्ण होताच रस्त्यावरील माती काढली जाईल असे नमूद केले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने मातीचे ढीग काढण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्यास सिडको यांच्या प्रतिनिधींना सांगितले. | १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.<br>२. सिडको, नवी मुंबई |
| २७ | श्री. डेबी गोएंका - दि.१२.१२.२०१८<br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी INS हमला येथे कांदळवनापासून ५० मिटरच्या आत भराव करुन खेळाचे मैदान तयार केल्यामुळे २०१६ मध्ये त्याच्या Contractor वर FIR दाखल केला आहे असे त्यांनी सांगितले.<br>• समितीने या तक्रारीचे संदर्भात पोलीसांनी तपास प्रलंबित असल्यामुळे पोलीसांनी या तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही पुर्ण करुन Chargesheet दाखल करण्यास व पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| २८ | अज्ञात व्यक्ती – दि.१०.१२.२०१८ | • समितीने सदर जागेवरील डेब्रिज हटविण्यास सांगितले व तेथील जागेवर कांदळवनाची लागवड करण्यास सांगितले | १. जिल्हाधिकारी, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | Mangrove Destruction | तसेच डेब्रिज टाकणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना मागील दिल्या होत्या.<br>• सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवरील डेब्रिज काढून टाकण्यात आले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या व त्यानुसार ही तक्रार बंद करण्यास सांगितले. | २. सिडको, नवी मुंबई.<br>अहवाल अप्राप्त |
| २९ | श्री. सुनिल अगरवाल – दि.१५.१२.२०१८<br>Destruction of Mangroves by Janakidevi Public School in Andheri (west) | • समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सदर क्षेत्राचे मुंबई महानगरपालिकेकडून Restoration करुन घेण्यास मागील बैठकीत सूचना देण्यात आल्या होत्या होत्या.<br>• सदर क्षेत्रावर अद्याप Restoration ची कार्यवाही झालेली नसल्याने समितीने पुन्हा या जागेवर लवकरात लवकर Restoration करण्याच्या सूचना मुंबई महानगरपालिकेला दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>२. मुंबई महानगरपालिका |
| ३० | श्री. विनोद पुन्शी- दि.१७.१२.२०१८<br>Effluents released in mangroves raise a stink-T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • समितीने या तक्रारीबाबत MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीत दिल्या होत्या.<br>• परंतु MPCB चे कोणीही प्रतिनिधीं बैठकीत उपस्थित नसल्यामुळे समितीने MPCB यांच्या प्रतिनिधींना प्राधान्याने पुढील बैठकीत उपस्थित राहण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यास सदस्य सचिवांना सांगितले. | १. जिल्हाधिकारी ठाणे<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ३२ | श्री. प्रसाद खाले - दि.१७.१२.२०१८<br>Destruction of Mangroves at Sagarmatha Club building, Colaba. | • जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या दि. २०.०२.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सागरमाथा आर्मी क्लबचे समुद्राकडील बाजूस बगिचा, हिरवळ ब्लॉकची पायवाट तयार करण्याचे काम सुरु असून MRSAC नागपूर यांचेकडील कांदळवन क्षेत्राचे नकाशात दर्शविलेनुसार कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही असे आढळून आले आहे. तथापी सदरचे शुशोभिकरणाचे काम/पेव्हर ब्लॉकची पायवाट तयार करणेचे काम कांदळवन बफर झोनमध्ये असल्याचे आढळून आले आहे.<br>• समितीने सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये असल्याने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींना योग्य ती कार्यवाही करण्यास सांगितले व पुन्हा वन विभागासही सदर जागेची तपासणी करण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई शहर<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ३३ | अज्ञात व्यक्ती KMC 17 - दि.२१.१२.२०१८<br>Mangrove filling malad West | • या तक्रारीबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई यांच्या दि. ३१.०१.२०१९ रोजीच्या आहवालानुसार सदरची जागा मोकळी असून पूर्वेस सोनाटा टॉवर पश्चिमेस गुरुकृपा डेव्हलपर्सच्या | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | इमारती असून उत्तरेस कच्चा रस्ता व दक्षिणेस मोकळी जागा झाडे आहेत. कांदळवनाची तोड तसेच कांदळवनाचा ऱ्हास झाले असल्याचे दिसून येत नाही असे वनपाल अंधेरी यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे.<br>• तसेच सदर जागेचे जी.पी.एस. रिडींगद्वारा अवलोकन केले असता सदर क्षेत्रावर २००५ साली कांदळवन अस्तित्वात नव्हते. अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्रापासून ५० मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने अहवालानुसार ही तक्रार बंद करण्याच्या सुचना दिल्या. | कांदळवन संधारण घटक, |
| ३४ | श्री. सुनिल अगरवाल<br>दि.१९.१२.२०१८<br>Systematic Destruction of Mangroves opposite D Mart, Malad Link Road , Malad | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर क्षेत्रात कांदळवन नसल्याचे सांगितले तसेच वन विभागामार्फत झालेल्या स्थळ पाहणीस देखील सदर क्षेत्र हे अधिसूचीत कांदळवनाचा भाग नसल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक,कांदळवन संधारण घटक. |
| ३५ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Mangroves near Jaskhar wetlands in Uran | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांनी या तक्रारीबाबतचा अहवाल आलेला नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तात्काळ चौकशी करावी व अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• ही तक्रार श्री. नंदकुमार पवार यांनी केलेल्या तक्रार क्र. २०, २२, २३ या संबंधीत असल्याचे सिडको यांनी सांगितले. | १. जिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड<br>२. सिडको, नवी मुंबई. |
| ३७ | श्री. नंदकुमार पवार-<br>दि.१९.०६.२०१८<br>2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी कांदळवनाची तोड झालेली नसून तेथे ब्रिजचे काम चालू आहे असे त्यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या बाबतचा अहवाल समितीस सादर करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |
| ३८ | श्री. नंदकुमार पवार-<br>दि.१९.०६.२०१८<br>4) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार उरण यांनी JNPT यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच या जागेवरील काम बंद करण्यात आले आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसिलदार उरण यांना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड |
| ३९ | श्री. नंदकुमार पवार-<br>दि.१९.०६.२०१८ | • या तक्रारीबाबत तहसिलदार उरण यांनी कांदळवनाचा | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 5) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. Dumping continues in full swing. | ऱ्हास झालेला नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्याबाबत तहसिलदार उरण यांना सांगितले. | |
| ४० | श्री.धिरज परब दि.२८.१२.२०१८ कांदळवन व नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास करणारा ठराव क्रमांक ६५ प्रकरण क्रमांक ६४ महासभा दिनांक ५/९/२०१८ | • समितीने मिरा-भाईंदर परिसरातील धिरज परब यांच्या सर्व तक्रारींवर स्थळ पाहणी करण्यासाठी SDO ठाणे, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक,श्री. स्टॅलिन डी व श्री. डेबी गोऐंका या सदस्यांची उप समिती गठीत करण्यात आली असून कांदळनाच्या सर्व तक्रारींबाबत श्री. धिरज परब यांच्यासोबत १५ दिवसात स्थळ पाहणी करण्याच्या व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे नोडल अधिकारी यांनी उपसमितीच्या कामकाजाचे समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे उपसमितीने स्थळ पाहणी व चौकशी करून अहवाल सादर करावा असे निर्देश दि. १६.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत दिले होते.<br>• तहसिलदार ठाणे यांनी श्री.धिरज परब यांच्या काही तक्रारींची स्थळ पाहणी अद्याप झाली असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने उर्वरित तक्रारींबाबतच केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल Part-1 आणि Part-2 या स्वरुपात दोन भागात देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना सांगितले. | जिल्हाधिकारी, ठाणे |
| ४१ | श्री.धिरज परब दि.२८.१२.२०१८ - भाईंदर पूर्व, जेसलपार्क चौपाटी येथील पालिकेने बेकायदा विकसित केलेल्या गुलाब बाग परिसरातील कांदळवनाच्या फांद्याची तोड, पालिकेने बसवलेले बेंच, लाद्या, माती काढून येथील प्रवेश बंद करणे तसेच संबंधित यांच्यावर वन कायद्या नुसार गुन्हा दाखल करणे बाबत | | |
| ४२ | श्री.धिरज परब दि.२९.१२.२०१८ मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पश्चिम प्रभाग समिती क्र 1, मुर्धा खाडी व परिसरात सर्रास कांदळवन, सीआरझेड व पाणथळ मध्ये बेकायदा झाडे तोडून, डेब्रिस, दगड माती भराव करून मोठ्या संख्येने बेकायदा बांधकामे बाबत. | | |
| ४३ | श्री. विक्रमसिंग राजपूत दि. ०२.०१.२०१९ Mangrove destruction in Sector 19, Kamothe, Navi Mumbai. | • या तक्रारीबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन संधारण घटक, नवी मुंबई अहवालानुसार सदर क्षेत्र हे कामोठे ते खांदेश्वर दरम्यान चे सिडको क्षेत्रातील आहेत.<br>• सदर क्षेत्रामध्ये नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळा करीता बाधीत असलेल्या कांदळवन क्षेत्रावर पर्यायी वनीकरणाद्वारे कांदळवन वृक्ष लागवड करण्यात आली असून सदरचे रोपवनाचे काम हे कांदळवन कक्षामार्फत करण्यात आले आहे.<br>• तक्रारीमध्ये दिलेल्या फोटोतील माणसे ही सदरील रोपवानात रखवालदारीची कामे करीत असून सदर मजूर | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२.सिडको. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोपवनात विविध कामे करत असतात तसेच चरामध्ये अडकलेला कचरा काढणे, संरक्षण,वेळताणे काढणे इ. कामे करत असतात. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे कांदळवनाचे नुकसान झालेले नाही.<br>• सदर जागेच्या बफर झोन मध्ये काम करण्यात आले आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी समितीने तक्रारदारासोबत स्थळ पाहणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी रायगड यांना दिल्या व त्या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | |
| ४४ | श्री. धिरज परब दि.०९.०१.२०१९ भाईंदर पश्चिम येथे खाडी किनारी जुना धक्का असताना बाजूलाच कांदळवन व पाणथळ चा ऱ्हास करून आणखी एक जेट्टीचे बांधकाम मेरीटाईम बोर्डाने सुरु केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास. | • उप समितीमार्फत स्थळ पाहणीचे निर्देश समितीने दिले आहेत. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे. |
| ४५ | श्री. रेजी अब्राहम दि.१०.०१.२०१९ Request action against enforcing authorities and land mafia constructing large scale illegal chawls, commercial galas, huts etc in the periphery of charkop village in violation of mumbai high courts orders vide PIL no 87 of 2006. | • समितीने श्री.रेजी अब्राहम यांच्या सर्व तक्रारींबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या उपसमितीमार्फत सदर जागेची स्थळ पाहणी करुन या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक,मुंबई. |
| ४६ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.११.०१.२०१९ Request to scrap Dronagiri holding pond killing mangroves. | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी सिडको यांचे Holding Ponds असल्यामुळे कांदळवनात पाणी जाण्यास अडथळा निर्माण झाला आहे असे त्यामुळे कांदळवनाची वाढ खुंटलेली आहे असे सांगितले<br>• सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर गेट बंद करण्याबाबत द्रोणागिरी जवळील रहिवाशांनी तक्रार आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेवरील गेट खुले करण्याच्या सूचना सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या.<br>• सदर जागेबाबत MoEF, MCZMA यांना बरेच पत्रव्यवहार करुन देखील त्यांची परवानगी प्राप्त झालेली नाही. त्या अनुषंगाने समितीने जो पर्यंत कादेशीर परवानगी मिळत नाही सदर जागचे गेट खुले करण्यात यावे. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२.सिडको, नवी मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • तसेच समितीने सदर जागेवर पावसाळा आल्यावर तेथे पाण्याच्या प्रवाहावर नियंत्रण ठेण्यासाठी विशेषत: भरतीचे प्रमाण मोठे असल्यास तेथील गेट बंद करण्यासाठी सांगितले व आवश्यक त्या परवानग्या घेतल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास सांगितले जेणेकरुन कांदळवनास व तेथील रहिवाशांना त्यांचा त्रास होणार नाही असे सांगितले. | |
| ४७ | श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.११.०१.२०१९<br>Request for Mangrove Park in JNPT/Uran | (टिप्पणीतील तक्रार क्र. ३८ व ३९ प्रमाणे कार्यवाही करावी) | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२. सिडको, |
| ४८ | श्री. सुनिल अगरवाल दि. ११.०१.२०१९<br>Illegal structures in Mangroves at Mini Sea Shore - Vashi | • या तक्रारीबाबत सिडको यांच्या दि. २०.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदरची जागा सिडको महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेली आहे. त्यामुळे सदरचा मुद्दा नवी मुंबई महानगरपालिकेकडे वळता करण्यात यावा ही विनंती केलेली आहे.<br>• तसेच तहसिलदार ठाणे यांच्या दि. २२.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सादर जागेत कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून येत नाही.<br>• या तक्रारीबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी सदर ठिकाणी झाडे लावण्यात आली आहेत व तेथे कांदळवन क्षेत्रात कोणतेही काम चालू नसल्याचे त्यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, ठाणे<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे<br>३. सिडको |
| ४९ | श्री. रेजी अब्राहम दि. 16.1.2019<br>Mangroves destruction | या तक्रारींबाबत समितीने पुढील कार्यवाहीसाठी उप समितीमार्फत श्री. रेजी अब्राहम यांच्या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक,मुंबई. |
| ५० | श्री. रेजी अब्राहम – दि.16.1.2019<br>Mangroves destruction | | |
| ५१ | श्री. रेजी अब्राहम - दि.19.1.2019<br>Mangroves destruction | | |
| ५२ | श्री. प्रसाद खाले – दि.28.01.2019<br>Destruction of mangroves, dumping of garbage at Nhava road near MTHL site, Ulwe | • या तक्रारीबाबत सिडको यांच्या प्रतिनिधींनी या जागेवर MSRDC चे काम चालू आहे असे सांगितले. ही तक्रार सिडको यांच्या अंतर्गत येत नाही.<br>• सदरची तक्रार गारबेज डंपिंग केल्याबाबत असल्याने ही तक्रार MPCB यांना पुढील कार्यवाही पाठविण्याबाबत समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | १. जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगङ<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड<br>३.सिडको,नवी मुंबई. |
| ५३ | श्री. रेजी अब्राहम – दि.31.01.2019<br>Dheeraj Bhandari regular | या तक्रारी संदर्भात समितीने मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना सदर जागेची योग्य तपासणी करुन सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम असल्यास ते हटविण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी |

| | | | |
|---|---|---|---|
| | land Mafia of charkop village , nonchalantly continues building his huge illegal ground floor plus one above room chawl ( 17rooms plus 17 rooms ) each room of 200 sq feet behind Jalaram temple in charkop village in violation | | उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक,मुंबई. |
| ५४ | श्री. रेजी अब्राहम – दि.02.02.2019<br>No necessary visit much less action so far by BMC R SOUTH WARD, collector western suburbs, mangroves cell, deputy collector encroachment nor charkop police station with regard to ongoing illegal chawl construction in CRZ restricted mumbai high court | या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना विभागीय वन अधिकारी, कांदळवन संधारण घटक यांच्या सोबत सदर जागेची स्थळ करुन या तक्रारीबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>३. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक,मुंबई. |
| ५५ | श्री. सुनिल पंडीत.दि- 4.02.2019<br>Appeal to stop of Mangrove in Miraroad | या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींना या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, ठाणे<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे |
| ५६ | श्री. सुनिल अगरवाल<br>Systematic Destruction of Mangroves in Nerul Seawoods behind TSC maritime institute. | या तक्रारीबाबत समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना सदर जागेवर श्री. सुनिल अगरवाल यांच्या सोबत स्थळ पाहणी करण्याचे व त्या बाबतचा स्थळ पाहणी अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले. | सिडको |
| ५७ | श्री. विके गांधी<br>Mangroves Destruction (DPS, Palm Beach Road, Navi Mumbai.) | • या तक्रारीबाबत विभागीय वन अधिकारी यांच्या अहवालानुसार DPS स्कूल पामबीच रोड नवी मुंबई येथे वनरक्षक नेरुळ व वनपाल वाशी यांनी स्थळावर समक्ष जाऊन पाहणी केली असता सदर ठिकाणी सिडकोमार्फत प्रवासी जलवाहतूकीसाठी जेट्टी बांधण्याचे काम चालू असल्याचे दिसून आले. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सदर कामासंबंधी पुर्व परवानग्या घेऊनचे सिडको मार्फत प्रवासी जलवाहतूकीसाठी जेट्टी बांधण्याचे काम चालू आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेले मोठया प्रमाणात कांदळवनाचा ऱ्हास होत असलेचे नमूद केले आहे ते पूर्णत: चूकीचे आहे. मंजूरी असलेल्या क्षेत्रातच वनखात्याच्या मंजूरीने वृक्ष तोडण्यात आली आहेत.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार अहवालानुसार पुढील बैठकीतून बंद करण्याच्या सूचना दिल्या. | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | श्री. सुनिल अगरवाल<br>Systematic Destruction of Mangroves in Ulwe on the opposite side of river of Sector 15 CBD Belapur - Survey 62. Mauje Targhar Ulwe Khadi using heavy machines | या तक्रारीबाबत समितीने तक्रार क्र.५२ नुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, रायगड जि. रायगड<br>२. निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड, जि. रायगड<br>३. व्यवस्थापकीय संचालक, सिडको,नवी मुंबई. |
| ५९ | श्री. फकरुद्दीन खान<br>Kausa-Mumbra Mangrove destroyed | या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांच्या प्रतिनिधींना वनक्षेत्रपाल कांदळवन कक्ष यांच्या समवेत स्थळ पाहणी करुन त्या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, ठाणे जि. ठाणे.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे |
| ६० | श्रीम.अंशु घोसाळ<br>Destruciton of Mangroves all along DPS lake. | या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना तक्रारदारासोबत व वनक्षेत्राल नवी मुंबई यांच्या समवेत स्थळ पाहणी करण्याच्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | सिडको |
| ६१ | श्री. सुनिल अगरवाल<br>Systematic Destruction of mangrove | या तक्रारी संदर्भात समितीने सदरची जागा ही वन विभागाअंतर्गत येत असल्याने विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना सदर जागेची स्थळ पाहणी करुन या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, ठाणे जि. ठाणे.<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, ठाणे जि. ठाणे. |

सह अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.